**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**वर्धा, कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – २३.०६.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २४ ते २८ जून २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २४/०६ | २५/०६ | २६/०६ | २७/०६ | २८/०६ |
| पाऊस (मिमी) | ७ | १ | १ | १० | ८ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३५ | ३५ | ३५ | ३४ |
| किमान तापमान (अं.से.) | २५ | २६ | २६ | २६ | २३ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८२ | ७८ | ७५ | ७५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६३ | ६० | ५५ | ५५ | ५० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ६ | ६ | ६ | ४ | ५ |
| वा-याची दिशा | ३२० | २४३ | २२५ | २३६ | २७० |

| हवामानाचा इशारा | येत्या आठवडाभर मान्सून चा प्रवाह सौम्य राहणार असल्याने दिनांक २३ जून रोजी बर्याच ठिकाणी हलका पाऊस अपेक्षित आहे तसेच दिनांक २४ -२७ जून रोजी हवामान ढगाळ राहील व काही ठिकाणी अति हलका पाऊस अपेक्षित आहे, या पार्श्वभूमीवर जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास तसेच पेरणी योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिके | | ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरणी आटोपली आहे त्यांनी पिकाला पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार त्वरित संरक्षित ओलीत द्यावे. तसेच इतर ठिकाणी पेरणीला योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. बियाणे खरेदी केले असल्यास किंवा घरचे बियाणे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासावी. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेडेंससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| सोयाबीन | पेरणी | पेरणीला योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. सोयाबीन बियाणे खरेदी केले असल्यास किंवा घरचे बियाणे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासावी. सोयाबीन पेरणीसाठी शिफारसीत वाण जेएस ९३-०५, जेएस ९५-६०, जेएस २०-२९, जेएस २०-३४, एमएयुएस-७१, एमएयुएस-१५८. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेडेंससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| कपाशी | पेरणी | या वर्षी कपाशी पेरणीसाठी देशी सुधारित वाण एकेए -५, एकेए-७, एकेए -८ साठी बियण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व त्यासाठी मध्यम भारी जमिनी करिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे व अमेरिकन सुधारित जातीमध्ये एकेएच- ०८१ (६० से. मी × ३० से. मी अंतर ढेवावे, यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे ), एकेएच- ०९-५ (सुवर्णा, शुबरा), पीकेव्ही - रजत, एकेएच - ८८२८ वाण वापरावे व त्यासाठी लागवड अंतर मध्यम भारी जमिनीकरिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे, ६० से.मी × ३० से.मी अंतर ढेवावे अनुक्रमे या प्रमाणे ढेवावे, |

| | | |
|---|---|---|
| | | यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे. देशी संकरीत जात पीकेव्ही-डीएच-१ व पीकेव्ही सुवर्णा वाणसाठी लागवड अंतर ६० × ४५ से. मी ढेवावे व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण ३.० ते ३.५ किलो वापरावे. |
| तूर | पेरणी | मौसमी पाऊसाचे पेरणीला योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. तूर पिकाकरीता वाण निवडतांना कमी कालावधीसाठी मध्यम जमिनी करिता ( टीएटी -१०, आएसीपीएल ८७, एकेटी-८८११), मध्यम कालावधीसाठी मध्यम ते भारी जमिनीसाठी (बीएसएमआर - ७३६, पिकेवि तारा, बीएसएमआर -८५३), तसेच अधिक कालावधीसाठी भारी जमिनी करिता (आयसीपीऐल – ८७१११९th (आशा) व सी-११) वाणांची निवड करावी व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + काबेंदेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | मौसमी पाऊसाचे पेरणीला योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. मुग पेरणीसाठी शिफरास केलेल्या जाती मध्ये पिकेवि- ग्रीन गोल्ड, पिकेवि-मुग ८८०२, पिकेवि - एकेएम-४ आणि उडीद पिकासाठी वाण जसे पिकेवि- उडीद -१५, टीएयु - १, टीएयु - २ व पिडीकेवि ब्लाक गोल्ड (एकेयु -१०-१). पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + काबेंदेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| ज्वारी | पेरणी | शिफारसी नुसार ज्वारीची पेरणी साठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. |
| भाजीपाला | | मिरची, वांगी, टोमाटेची, पत्तागोबी व फुलगोबी या पिकांची ४ ते ६ आठवडे वयांचे रोपाची शेतात लागवड करावी. भेंडी, वाल, चवळी, कारली, ढेमसे, भोपळा, कोहळे, दोडके, व अद्रक यांची लागवड करावी. निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी. |
| फळझाडे | | लागवडीसाठी खोदलेले खड्डे शेणखत ४-५ घमेले + सिंगल सुपर फॉस्फेट १ ते २ किलो + मिथिल पराथीयान भुकटी साधारण १०० ग्राम या मिश्रणाने भरून ठेवावेत. खड्डे भरतांना मध्यभागी मातीचा उंचवटा करावा व मध्यभागी कडी रोवावी. पेरणीला योग्य पाऊस झाल्यावर रोपांची लागवड करावी.<br><br>आंबिया बहाराची फळे असलेल्या संत्रा झाडांना नियमित ओलीत करावे, येत्या दिवसात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे त्यामुळे फळझाडाचे खोडास १ मीटर उंची पर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. ( १ किलो मोरचूद -१ किलो कळीचा चुना – १० लिटर पाणी व ५ लिटर गोमुत्र ). |
| पशु / जनावरे | | शेतकऱ्यांनी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठया भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठयात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये. वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्यामुळे जनावरांना व पक्षांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.